# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट क्र-२८ दिनांक - ०१/०१/२०२४

## घरफोडी चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक करुन ३ गुन्हांची उकल
## नवघर पोलीस ठाणेची कामगीरी

नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ५६/२०२४ भा.दं.वि.सं.कलम-३८०,४५७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. नमुद गुन्हयातील फिर्यादी श्री.राहुल मुक्तीनारायन पाठक, वय-५४ वर्षे, व्यवसाय-व्यापार, रा. रुम नंबर १०२, ए विंग, आशाकिरण बिल्डींग, विमल डेरी रोड, नवघर, भांईदर पुर्व, ता.जि.ठाणे यांचे शॉप नं १३, माताजी मसाला बाजार, विमल डेरी जवळ भाईंदर पुर्व या बंद दुकाणाचे कुलुप तोडुन शटर उचकटुन कोणीतरी अज्ञात चोरट्याने दिनांक २७/०१/२०२४ रोजी रात्रै २१.०० वा. ते २८/०१/२०२४ रोजी सकाळी ०९.०० वा.चे दरम्यान रुपये ४,९००/- रोख रक्कम तसेच ०५ काजु पॉकेट असा मुद्देमाल रात्रौ घरफोडी चोरी करुन फिर्यादीचे संमतीशिवाय स्व:ताच्या फायद्याकरीता लबाडीच्या इराद्याने चोरी करुन चोरुन नेलेबाबत फिर्यादी यांनी पोलीस ठाणेस येवुन तक्रार दिल्याने सदरचा गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असल्याने त्याची माहीती मा.वरिष्ठांना देवुन त्यांचा मार्गदर्शनाप्रमाणे नमुद गुन्हयाचा तपास सुरु केला व प्रथम गुन्हयाच्या घटनास्थळाला भेट दिली. घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर तांत्रिक तपास करुन आरोपी नामे १) जयसींग दत्तु राठोड, वय-२० वर्षे, व्यवसाय-व्यापार, रा.जी -१५,गल्ली नं ८,सिध्दीवीनायक चाळ,नेहरु नगर, भाईंदर पश्चिम,जि.ठाणे तसेच २) सुरज मोतलाल त्रीपाठी, वय-२२ वर्षे, व्यवसाय-नोकरी, रा.जी-१०,गुप्ता गल्ली,नेहरु नगर, भाईंदर पश्चिम,जि.ठाणे यांना भाईंदर पश्चिम येथुन ताब्यात घेवुन त्यांचेकडे तपास केला असता त्यांचा सदर गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना नमुद गुन्हयात दि.२९/०१/२०२४ रोजी अटक करण्यात आली होती. अटक आरोपी यांना मा.न्यायालयात हजर केले असता मा.न्यायालयाने अटक आरोपी यांची दि.०१/०२/२०२४ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर केली होती. अटक आरोपी यांचाकडे पोलीस कोठडी दरम्यान केलेल्या तपासात नवघर पोलीस ठाण्यात दाखल असलेले खालीलप्रमाणे गुन्हे उघडकीस आलेले आहे. तसेच आरोपी यांचा ताब्यातुन एकुण ३१,४००/- रुपये किंमतीची मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे.

**-उघडकीस आलेले गुन्हे खालीलप्रमाणे-**

| अ.क्र | गुन्हा क्रमांक | कलम |
|---|---|---|
| १ | गु.र.क्र-५६/२०२४ | कलम-३८०,४५७ भादवि (मुळ गुन्हा) |
| २ | गु.र.क्र-६१/२०२४ | कलम-३८०,४५७ भादवि |
| ३ | गु.र.क्र-६२/२०२४ | कलम-३८०,४५७ भादवि |

सदरची कामगिरी श्री. मधुकर पांण्डेय, पोलीस आयुक्त, मि.भा-व.वि.पोलीस आयुक्तालय, श्री. श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त, श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, श्री.उमेश माने-पाटील, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचा मार्गदर्शनाखाली धिरज कोळी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, स.पो.नि.संदिप पालवे, विशाल धायगुडे, पो.उप.निरी.ज्ञानेश्वर आसबे, पो.हवा. संतोष पाटील, भुषण पाटील, सुरेश चव्हाण, नवनाथ घुगे, पो.अं. ओंकार यादव, सुरजसिंग घुनावत तसेच जाधव यांनी केलेली आहे.